# निर्माते, दिग्दर्शक दासबाबू यांचे निधन

लोकसत्ता खास प्रतिनिधी

**मुंबई :** मराठीतील लोकप्रिय मालिका तसेच चित्रपटांचे निर्माते- दिग्दर्शक दासबाबू यांचे रविवारी, १३ फेब्रुवारी रोजी रात्री अल्पशा आजाराने निधन झाले. ते ७७ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा आणि मुलगी असा परिवार आहे.

एका बंगाली माणसाचे मराठी प्रेम आणि त्या प्रेमातून त्याने केलेल्या मालिका आणि चित्रपट हे अप्रूप दासबाबू यांच्याबाबतीत कायम होते. दूरसंचार क्षेत्रातील नोकरीनिमित्त महाराष्ट्रात वास्तव्याला आलेल्या दासबाबूंचे मूळ नाव दिलीप कुमार दास.

मराठी माणसांना जिंकून घ्यायचे तर त्यांची भाषा आत्मसात करायला हवी हे त्यांनी हेरले. मराठीवरच्या प्रेमातून त्यांनी सह्याद्री वाहिनीवर काही लोकप्रिय मालिकांची निर्मिती आणि दिग्दर्शनाची धुरा यशस्वीपणे सांभाळली. 'लढा', 'एक धागा सुखाचा', 'आई', 'सापळा', 'हे बंध रेशमाचे', 'हसण्यासाठी जन्म आपला', 'वाजवा रे वाजवा', 'वामनाश्रम', 'श्रीमंताची लेक', 'नांदा प्रेम भरे' अशा अनेक मालिकांचे दिग्दर्शन त्यांनी केले होते.

मराठीतील अनेक दिग्गज कलावंतांबरोबर त्यांनी मालिका केल्या. मालिका निर्मिती -दिग्दर्शनात यशस्वी ठरल्यानंतर त्यांनी पुढचे पाऊल म्हणून चित्रपट दिग्दर्शनाचाही प्रयत्न केला.

शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या प्रश्नाचा वेध घेणाऱ्या 'तहान' या चित्रपटाचे दिग्दर्शन दासबाबूंनी केले होते.

# पुणे-शिर्डी-नागपूर विमानसेवा शुक्रवारपासून

## महाराष्ट्र विमानतळ विकास प्राधिकरणचे उपाध्यक्ष दीपक कपूर यांची घोषणा

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**मुंबई :** पुणे- शिर्डी- नागपूर विमानसेवा येत्या शुक्रवारपासून सुरू करणार असून पुणे- औरंगाबाद- नागपूर ही विमानसेवा १ मार्चपासून सुरू होणार असल्याचे महाराष्ट्र विमानतळ विकास प्राधिकरणचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक दीपक कपूर यांनी जाहीर केले.

राज्यातील विविध शहरांतील विमानतळांचा विकास व नवीन सेवा सुरू करण्यासाठी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अॅन्ड अॅग्रिकल्चरचे अध्यक्ष ललित गांधी यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने दीपक कपूर यांची भेट घेतली. त्यावेळी ते बोलत होते.

### अन्य शहरांसाठी काय?

- कोल्हापूर व रत्नागिरी विमानतळासाठी लागणारा निधी महाराष्ट्र सरकार मंजूर करणार.
- शिर्डी येथे स्वतंत्र मालवाहतूक टर्मिनल उभारणार
- अमरावती येथील विमानतळासाठी केंद्राकडून ५२ कोटी रुपये मंजूर, पहिल्या टप्प्यात ६.५ कोटी रुपये प्राप्त

राज्यातील विमानतळांच्या समस्या सोडविणे व विकास करण्यासाठी महाराष्ट्र चेंबरने निवेदनाद्वारे केलेल्या सूचनाबाबतही सकारात्मक विचार करून अंमलबजावणी करण्यात येईल व राज्यातील विमानसेवांचा कालबद्ध विकास केला जाईल अशी ग्वाही कपूर यांनी दिली.

या बैठकीत ललित गांधी यांनी प्रामुख्याने कोल्हापूर, उत्तर महाराष्ट्र, कोकण, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र या विभागातील शेतमालाला प्रोत्साहन मिळण्याच्या दृष्टीने जिल्हास्तरीय माल वाहतूक विमानसेवा सुरू करण्याची मागणी केली. कोल्हापूर व रत्नागिरी विमानतळासाठी लागणारा निधी महाराष्ट्र सरकारकडून मंजूर केला जाणार आहे. शिर्डी येथे स्वतंत्र मालवाहतूक टर्मिनल उभारणार आहे. अमरावती येथील विमानतळासाठी भारत सरकारकडून ५२ कोटी रुपये मंजूर करण्यात आले असून पहिल्या टप्प्यात ६.५ कोटी रुपये मिळाले आहेत. तसेच अमरावती विमानतळासाठी महाराष्ट्र सरकारकडून अतिरिक्त २३ कोटी मिळणार असल्याचे दिपक कपूर यांनी सांगितले.

नोव्हेंबर २०२२ पासून अमरावती विमानतळावरून प्रवासी विमानसेवा सुरू करण्याचा प्रयत्न असल्याचेही दीपक कपूर यांनी सांगितल्याची माहिती महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सतर्फे देण्यात आली.

# 'समृद्धी'च्या टोलवसुली निविदेला मुदतवाढ

लोकसत्ता प्रतिनिधी

**मुंबई :** नागपूर समृद्धी महामार्गातील २६ टोलनाक्यांवरील टोलवसुलीसाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने (एमएआरडीसी) निविदा मागविल्या होत्या. सोमवारी निविदा सादर करण्याची अंतिम मुदत होती. मात्र या निविदेला एका आठवड्याची मुदतवाढ देण्यात आली आहे.

या ७०१ किमी लांबीच्या महामार्गात २६ टोलनाके आहेत. या महामार्गातील नागपूर ते वैजापूर, औरंगाबाद असा ३६० किमीचा पहिला टप्पा (काही भाग वगळून) लवकरच वाहतूक सेवेत दाखल होण्याची शक्यता आहे. हा मार्ग सेवेत दाखल करण्यासाठी टोलवसुलीचे कंत्राट अंतिम होणे गरजेचे आहे. त्यामुळे एमएसआरडीसीने जानेवारीत २६ टोलनाक्यांवरील टोलवसुलीसाठी निविदा मागविल्या होत्या. सोमवारी निविदा सादर करण्याची अंतिम तारीख होती, पण एमएसआरडीसीकडून या निविदेला एक आठवड्याची मुदतवाढ देण्यात आली आहे.

करोनाच्या पार्श्वभूमीवर काही कंपन्यांनी निविदा सादर करण्यासाठी मुदतवाढ मागितली होती. या मागणीनुसार ही मुदतवाढ देण्यात आल्याची माहिती एमएसआरडीसीतील एका वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली.

# गणवेशाच्या रंगाचा हिजाब वापरण्याची मुलींची विनंती

(पान ३ वरून)

अर्थसंबंधित, राजकीय किंवा इतर धर्मनिरपेक्ष कृतींचे नियमन करणारा किंवा त्यांना प्रतिबंध करणारा कायदा नाही, असा युक्तिवाद अॅड. कामत यांनी केला.

शाळा गणवेश ठरवण्यासाठी सरकारने एका आमदाराच्या नेतृत्वाखाली महाविद्यालय विकास समिती (सीडीसी) नियुक्ती केली आहे. आमदाराच्या नेतृत्वाखालील ही समिती घटनात्मक नाही. काय परिधान करावे हे ठरवण्यासाठी ही समिती हा एक तृतीय पक्ष आहे. सरकारने आपली जबाबदारी या तृतीय पक्षावर सोपवली आहे, असेही अॅड. कामत यांनी न्यायालयास सांगितले.

# समाजमाध्यमी शुभेच्छांमुळे प्रेमदिनी गुलाबांच्या मागणीत घट

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** प्रेमदिनाला गुलाब पुष्प देऊन प्रेमभावना व्यक्त करणाऱ्या प्रेमवीरांना समाजमाध्यमाची भुरळ पडली आहे. समाजमाध्यमातून शुभेच्छा व्यक्त करून प्रेमदिन साजरा करण्याचे प्रमाण वाढले असून गेल्या काही वर्षांचा विचार करता यंदा गुलाबांना अपेक्षेएवढी मागणी राहिली नाही. गुलाबांना मोठी मागणी नव्हती, अशी माहिती मार्केट यार्डातील फूल व्यापाऱ्यांनी दिली.



प्रेमदिनानिमित्त गेल्या दोन दिवसांपासून पुणे जिल्ह्यातील मावळ तसेच शिरूर तालुक्यातून मार्केटयार्डातील फूलबाजारात गुलाबांची आवक होत होती. करोनापूर्व काळात प्रेमादिनाच्या दिवशी गुलाबांना मोठी मागणी असायची. मात्र, गेल्या दोन वर्षांत गुलाबांना अपेक्षेएवढी मागणी यंदा नव्हती. यंदा मागणीत ३० ते ४० टक्के घट झाल्याचे व्यापाऱ्यांनी सांगितले.

मार्केट यार्डातील फूल बाजारातून किरकोळ बाजारातील विक्रेते गुलाब खरेदी करतात. मात्र, किरकोळ विक्रेत्यांकडून गुलाबांच्या मागणीत घट झाली आहे, असे श्री छत्रपती शिवाजी मार्केट यार्डातील फूल व्यापारी सागर भोसले यांनी सांगितले. अनेकजण समाजमाध्यमावरून शुभेच्छा पाठवत असल्याने गुलाब फुलांच्या मागणीत घट झाल्याचे निरीक्षण त्यांनी नोंदविले. प्रेमदिनाला साध्या गुलाबाला फारशी मागणी नसते. लाल डच गुलाबांना युवक युवतींकडून मागणी असते. डच गुलाबांमध्ये लाल, पिवळा, पांढरा, नारंगी, अबोली असे रंग उपलब्ध आहेत. विवाह समारंभात विविध रंगी गुलाब फुलांचा सजावटीसाठी तसेच हारांसाठी वापर करण्यात येतो, अशीही माहिती भोसले यांनी दिली. घाऊक बाजारातील गुलाब गड्डीचे दर २० ते ४० रुपये, डच गुलाब (२० नग) १०० ते २५० रुपये असे होते.

> करोनापूर्व काळात प्रेमदिनाच्या दोन दिवस आधी किरकोळ बाजारातील विक्रेते गुलाबांची खरेदी करायचे. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा गुलाबांना चांगली मागणी राहील, अशी शक्यता वाटत होती. मात्र, गुलाबांना अपेक्षेएवढी मागणी नाही.
>
> – सागर भोसले, फूल व्यापारी, श्री छत्रपती शिवाजी मार्केट यार्ड, फूल बाजार


SBI भारतीय स्टेट बँक

प्रादेशिक व्यवसाय कार्यालय, नवी मुंबई (५१४१)
जी १०१ ते जी १०६, टॉवर-३, १ला मजला, बेलापूर रेल्वे स्टेशन कॉम्प्लेक्स, सीबीडी, बेलापूर, नवी मुंबई-४००६१४.

**सोन्याच्या लिलावाची सूचना**

विशेषत: कर्जदार तसेच सर्वसाधारणपणे सर्व जनतेस एतद्वारे सूचित करण्यात येते कि खाली उल्लेख केलेल्या तारखेवर खाली दिलेल्या शाखेवर तारण म्हणून दिलेल्या सोन्याच्या दागिन्यांचा जाहीर लिलाव आयोजित करण्याचे प्रस्तावित आहे. नोंदणीकृत पत्रांद्वारे सूचित करूनही ज्या ग्राहकांनी त्यांच्या कर्जाची रक्कम भरली नाही अशा कसूरवार ग्राहकांच्या सोन्याच्या दागिन्यांचा हा लिलाव आहे. स्थळ व तारखेत, जर कोणताही बदल झाल्यास, तो लिलाव केंद्रावर प्रदर्शित केला जाईल. लिलाव न झालेल्या सोन्याच्या वस्तूंचा, लिलाव केंद्रावर तपशील दर्शविल्यानंतर, पुढच्या कामकाजाच्या दिवसांवर लिलाव केला जाईल. **हा लिलाव दि. १८/०२/२०२२ रोजी सकाळी १०:०० वाजेपासून, भारतीय स्टेट बँकेच्या खालील शाखेवर आयोजित केला जाईल.**

**१) वसुंधरा हाइटस् जुई नगर शाखा (२१४६४):** दुकान क्र. ४-७, प्लॉट क्रमांक ५, वसुंधरा हाइटस् बिल्डिंग, सेक्टर-११, जुई नगर रेल्वे स्टेशन समोर, सानपाडा, नवी मुंबई - ४००७०५. मोबाईल - ८१४९८ ५५८९८.

**प्राधिकृत अधिकारी, भारतीय स्टेट बँक करीता**

टिप : पूर्व सूचनेशिवाय बँकेने सर्व ठिकाणी लिलाव रद्द करण्याचे अधिकार आरक्षित केले आहेत.


# बाजारावर झाकोळ

(पान ३ वरून)

५.४९ टक्क्यांची घसरण दिसून आली. गुरुवारी रिझर्व्ह बँकेच्या 'जैसे थे' पतधोरणाने मोठी मूल्यवाढ झालेल्या स्टेट बँक, आयसीआयसीआय, एचडीएफसी, इंडसइंड, कोटक बँक आणि मारुतीच्या समभागांत गुंतवणूकदारांनी नफावसुली केली. सर्वच १९ क्षेत्रीय निर्देशांकांना नुकसान सोसावे लागले. स्थावर मालमत्ता, धातू आणि बँकिंग निर्देशांक पाच टक्क्यांहून अधिक घसरले. व्यापक बाजाराचे प्रतिनिधित्व करणाऱ्या स्मॉलकॅप आणि मिडकॅप निर्देशांकात प्रमुख निर्देशांकापेक्षा मोठी ४.१५ टक्क्यांची घसरण झाली.

**गुंतवणूकदारांना साडेआठ लाख कोटींचा फटका**

सलग दोन सत्रांत 'सेन्सेक्स'ने एकूण २,५२०.१९ अंशांनी गटांगळी खाल्ली आहे. शुक्रवारच्या सप्ताहाअखेरच्या व्यवहारात अमेरिकेतील चार दशकांतील उच्चांकावर पोहोचलेल्या महागाईच्या धडकीने 'सेन्सेक्स'मध्ये ७७८ अंशांची घसरण झाली होती. सोमवारच्या पडझडीमुळे गुंतवणूकदारांच्या मत्तेतील ८.४७ लाख कोटी रुपयांचा ऱ्हास झाला आहे. ताज्या घसरणीचा सर्वात मोठा दणका बाजारात नव्याने सूचिबद्ध झालेल्या नवउद्यमी कंपन्या म्हणजे वन९७ कम्युनिकेशन्स (पेटीएम), झोमॅटो, नायका आणि पीबी इन्फोटेक या समभागांना बसला.

# वीज प्रकल्पांत कोळशाचा वापर कमी करण्यावर भर

(पान ३ वरून)

सरकारच्या नियमानुसार राखेचा १०० टक्के वापर केला जाईल, याबाबत आम्ही अभ्यास करणार आहोत. पायाभूत सुविधांच्या प्रकल्पामध्येही राखेचा वापर केला जाईल, असे ठाकरे म्हणाले.

पंतप्रधानांनी ग्लासगो येथील हवामान परिषदेत (सीओपी२६) २०७० पर्यंत शून्य कर्बउत्सर्जनाचे लक्ष्य जाहीर केले. ते गाठण्याच्या अनुषंगाने महाराष्ट्राचा हा निर्णय महत्त्वाचा आहे. महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनीनुसार, राज्याची विद्युतनिर्मिती क्षमता १३,६०२ मेगावॉट आहे. त्यापैकी कोळसाधारित औष्णिक विजेचे प्रमाण सुमारे ७५ टक्के म्हणजेच १०, १७० मेगावॉटइतके आहे. राज्याच्या मालकीच्या औष्णिक वीजनिर्मिती केंद्रांमध्ये चंद्रपूर, कोराडी, खापरखेडा, नाशिक, परळी, भूसावळ आणि पारस येथील विद्युतनिर्मिती केंद्रांचा समावेश होतो.

**'केवळ नाणेफेक झाली, सामना तर होऊ द्या'**

शिवसेनेचे खासदार संजय राऊत मंगळवारी पत्रकार परिषद घेणार आहेत. त्यात ते काय बोलणार, असे पत्रकारांनी पर्यावरणमंत्री आदित्य ठाकरे यांना विचारले असता ''आता केवळ नाणेफेक झाली आहे, सामना तर होऊ द्या'', अशी सूचक टिप्पणी ठाकरे यांनी केली. त्यामुळे राऊत यांच्या पत्रकार परिषदेबाबत उत्सुकता अधिक वाढली आहे.

# रब्बी ज्वारीच्या क्षेत्रात सरासरीपेक्षा ३२ टक्के घट

(पान ३ वरून) सरासरीचा विचार करता ३२ टक्के घट झाली आहे. रब्बी ज्वारीचे क्षेत्र घटत असताना गव्हाचे क्षेत्र सरासरीपेक्षा २२ टक्के, मक्याचे क्षेत्र २८ टक्के, हरभरा ५६ टक्के, तीळ १६ टक्के वाढले आहे. गव्हाचे सरासरी क्षेत्र ८ लाख ७५ हजार ६३३ हेक्टर असून यंदा १० लाख ७४ हजार ९३१ हेक्टरवर गहू घेतला जात आहे. मक्याचे सरासरी क्षेत्र २ लाख ६३ हजार ८९६ हेक्टर असून यंदा ३ लाख ३८ हजार ८५२ हेक्टरवर मका घेतला जात आहे. हरभऱ्याचे सरासरी क्षेत्र १७ लाख ४३ हजार २५९ हेक्टर होते ते आता २४ लाख ८० हजार ५४९ हेक्टर झाले आहे. तिळाचे सरासरी क्षेत्र १६३० हेक्टर होते. पण यंदा १८९३ हेक्टरवर तीळ घेतला जात आहे.


इंडियन बैंक Indian Bank
इलाहाबाद ALLAHABAD

**SAM Branch, First Floor, 17 Parliament Street, New Delhi-110001 (Ph. 011-23417717, 23412168, 23412166) Email: armbdelhi@indianbank.co.in**

IB/SAM Delhi/302/2021-22 — Date: 22/09/2021

**Show Cause Notice to Suspended Directors of M/s. IL & FS Financial Services Limted (IFIN) with SAM Delhi Branch**

| | |
|---|---|
| 1. Mr. Ravi Ramaswamy Parthasathy | 1201-1202 Vinayak Aangan Old Prabhadevi Road, Prabhadevi Mumbai - 400025 |
| 2. Mr. Ramesh C Bawa | W-78 Greater Kailash, Part-I, Delhi-110048 |

Dear Sir,

**Sub: M/s. IL & FS Financial Services Limited (IFIN) with SAM Delhi Branch - Classifying as Wilful Defaulter – show cause notice.**

This is as per the direction of Wilful Defaulter Screening Committee (WDSC) issued vide its order/decision dated 13.05.2021 and in terms of the findings of the said Screening Committee wherein the committee observes as under:

That, the first to second of you are the suspended directors borrower Company has availed credit facility under Consortium from our bank. The aforesaid borrower company i.e. Mis. IL & FS Financial Services Limited (IFIN) was sanctioned credit facility of Rs:-

| Facility | In crores | Date of last sanction | Name of the Bank |
|---|---|---|---|
| OCC/TL/BG | 310.00 | 22/05/2018 | Indian Bank, New Delhi Main Branch |
| Term Loan | 300.00 | 29/11/2017 | IFB Branch (eAB) Parliament Street New Delhi |

on the terms and conditions as stipulated in the sanction letters mentioned above & in the documents executed by all of you in pursuance thereto through our above named branches. The limit sanctioned to the company are secured by Hypothecation/EM of as securities as mentioned in the above said sanctioned ticket.

The aforesaid borrower company was requested to pay interest and other charges and also the installments of the principal in accordance with the terms of the sanction ticket and loan agreements executed by the borrowers / guarantors. However, the borrower company has failed for payment of dues and committed default in performing the conditions in the loan agreement, causing thereby classification of the account as NPA as per RBI guidelines.

The status of the account is enumerated hereunder: (in crores)

| S.No. | Name of the Bank | Date of NPA | Dues on 30/06/2019 |
|---|---|---|---|
| 1. | Indian Bank | Sub Standard flagged on 31/12/2018 w.e.f 30/09/2018. | 373.37 |
| 2. | LCB Madhya Marg (eAB) | 29/12/2018 | 201.12 |
| | | Total | 574.49 |

In view of the default committed by the borrower company, the case was examined by the WDSC on 13.05.2021 with a view to ascertain willful default on the part of Directors as per the guidelines laid down by the RBI. It was observed by the screening committee that the Directors had committed various willful irregularities/defaults as detailed hereunder and accordingly meets the criteria to be classified as willful Defaulter in terms of the guidelines laid down by the RBI.

The irregularities/defaults/evidences as extracted out by the screening committee and directed to be communicated to the suspended directors calling for their submission as to why they should not be a declared as willful defaulter as per RBI guidelines are enumerated as under:

**Cause of Action:** Diversion & Siphoning of funds —2.1.3(b) read with 2.2.1(a), 2.2.1(c) & 2.2.1 (e) & 2.1 .3(c)

Date: 10.02.2022
Place: New Delhi

Branch Manager,
For Wilful Defaulter Screening Committee (WDSC)



**PUBLIC NOTICE**

Notice is hereby given that the certificates for the undermentioned Equity Shares of the Company have been lost and their holders of the said equity shares have applied to the Company to issue duplicate share certificates. Any person who has a claim in respect of the said shares should lodge the same with the Company at its Registered office within 15 days from this date else the Company will proceed to issue duplicate certificates to the aforesaid applicants without any further intimation.

| Folio No. | Company | Name of share share holders | No. Of Shares | Dist Nos. From. To | Cert.No. From. To |
|---|---|---|---|---|---|
| JSW0723877 | JSW STEEL LTD | C S MEHTA SULTAN THARIANI | 1000 | 2417205691-2417206690 | 2701680 |
| JSW0723881 | JSW STEEL LTD | SANJAY MEHTA SULTAN THARIANI | 1000 | 2417206691-2417207690 | 2701681 |

Date:12-02-2022

Sd/-
SANJAY CHAMPAKLAL MEHTA
SULTAN RAHIM THARIANI
(New Name of the Share Holders)



Asian Energy Services

**एशियन एनर्जी सर्व्हिसेस लिमिटेड**
(पूर्वीची एशियन ऑईलफिल्ड सर्व्हिसेस लिमिटेड)
सीआयएन: एल२३२००एमएच१९९२पीएलसी३१८३५३
नोंद कार्यालय: ३बी, ३रा मजला, ओमकार ईस्क्वेअर, चुनाभट्टी सिग्नल, इस्टर्न एक्स्प्रेस हायवे, सायन (पूर्व), मुंबई ४०००२२, महाराष्ट्र, भारत
दूर : ०२२-४२४४११००; फॅक्स : ०२२-४२४४११२० संकेतस्थळ : www.asianenergy.com

**डिसेंबर ३१,२०२१ रोजी संपलेल्या तिमाही आणि नऊ महिन्यांसाठी अ-लेखापरीक्षित वित्तीय निष्कर्षाच्या निवेदनाचा आराखडा.**

(रु. लाखामध्ये प्रति समभाग माहिती वगळता)

| तपशील | संपलेली तिमाही | संपलेले नऊ महिने | संपलेली तिमाही |
|---|---|---|---|
| | ३१.१२.२०२१ | ३१.१२.२०२१ | ३१.१२.२०२० |
| | अ-लेखापरिक्षित | अ-लेखापरिक्षित | अ-लेखापरिक्षित |
| कार्यामधून एकूण उत्पन्न (निव्वळ) | ६,९९८.०० | १९,८५६.९७ | ४,६१७.४६ |
| कालावधीसाठी निव्वळ नफा/(तोटा) (कर, अपवादात्मक आणि / किंवा अतिविशिष्ट बाबीपूर्व) | ६०७.८५ | ३,०५७.०९ | ८२६.५८ |
| करपूर्व कालावधीसाठी निव्वळ नफा/(तोटा) (अपवादात्मक आणि/किंवा अतिविशिष्ट बाबीपश्चात) | ६०७.८५ | ३,०५७.०९ | ८२६.५८ |
| करपश्चात कालावधीसाठी निव्वळ नफा/(तोटा) (अपवादात्मक आणि / किंवा अतिविशिष्ट बाबीपश्चात) | ४४९.८७ | २,९८४.७२ | ८२०.७१ |
| कालावधीसाठी एकूण सर्वंकष उत्पन्न (कालावधीसाठी एकत्रित नफा/(तोटा) आणि (करपश्चात) अन्य व्यापक सर्वंकष उत्पन्न (करपश्चात)) | ४४६.०६ | ३,०५३.५९ | ७४७.३१ |
| सम भागभांडवल (प्रत्येकी रु. १०/- दर्शनी मूल्याचे) | ३,७९९.३९ | ३,७९९.३९, | ३७९९.३९ |
| राखीव (गत हिशोबाच्या वर्षाच्या ताळेबंदानुसार पुनर्मूल्यांकित राखीव वगळता राखीव) | | | |
| प्रति समभाग उत्पन्न (अतिविशिष्ट बाबीपूर्व आणि नंतर) (रु.१०/- प्रत्येकीच्या) | | | |
| मूळ : (रु.मध्ये) | १.१८ | ७.८९ | २.१७ |
| सौम्यीकृत : (रु. मध्ये) | १.१८ | ७.८९ | २.१७ |

टिपा :

१. महत्त्वाची एकमेव आर्थिक माहिती खालीलप्रमाणे :

| तपशील | संपलेली तिमाही | संपलेले नऊ महिने | संपलेली तिमाही |
|---|---|---|---|
| | ३१.१२.२०२१ | ३१.१२.२०२१ | ३१.१२.२०२० |
| | अ-लेखापरिक्षित | अ-लेखापरिक्षित | अ-लेखापरिक्षित |
| कार्यामधून एकूण उत्पन्न | ६,३६६.८६ | १९,२२५.८० | ३,१६०.३३ |
| करपूर्व नफा/(तोटा) | ६६१.२० | ५,१६७.३२ | (९६.६०) |
| करपूर्व कालावधीसाठी निव्वळ नफा/(तोटा) (अपवादात्मक आणि किंवा अतिविशिष्ट बाबीपश्चात) | ६६१.२० | ५,१६७.३२ | (९६.६०) |
| कालावधीसाठी एकूण सर्वंकष उत्पन्न (कालावधीसाठी एकत्रित नफा/(तोटा) आणि (करपश्चात) अन्य व्यापक सर्वंकष उत्पन्न (करप्रश्चात)) | ५०२.७१ | ५,०९३.४२ | (९६.६६) |

२. वरील एकत्रिकृत वित्तीय निष्कर्षाचे समीक्षण करण्यात आले आहे आणि लेखा समितीद्वारे शिफारस करण्यात आली आहे आणि संचालक मंडळाने १४ फेब्रुवारी २०२२ रोजी झालेल्या त्यांच्या सभेमध्ये नोंद पटावर घेतले.

३. सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन अॅण्ड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट) नियमावली, २०१५च्या ३३च्या अनुषंगाने बीएसई लि.मध्ये सादर करावयाच्या ३१ डिसेंबर २०२२ रोजी संपलेल्या त्रैमासिक आणि नऊ महिन्यांसाठी अलेखापरीक्षित स्वतंत्र आणि एकत्रिकृत वित्तीय निष्कर्षाचा तपशीलवार आराखडा आहे. ३१ डिसेंबर २०२२ रोजी संपलेल्या त्रैमासिक आणि नऊ महिन्यांसाठीच्या वित्तीय निष्कर्षाचा पूर्ण आराखडा स्टॉक एक्सचेंजच्या म्हणजेच www.bseindia.com आणि www.nse.india.com ह्या संकेतस्थळावर आणि कंपनीच्या संकेतस्थळावर म्हणजेच www.asian energy.com वर उपलब्ध आहे.

एशियन एनर्जी सर्व्हिसेस लिमिटेड, करिता
(पूर्वीची एशियन ऑईलफिल्ड सर्व्हिसेस लिमिटेड)
सही/-
आशुतोष कुमार
पूर्ण वेळ संचालक आणि सीईओ
डीआयएन : ०६९१८५०८

ठिकाण : मुंबई
दिनांक : १४ फेब्रुवारी २०२२



**जयसिंथ डायस्टफ (इंडिया) लिमिटेड**
सीआयएन : एल२४११४एमएच१९८५पीएलसी०३५५६४
नोंदणीकृत कार्यालय : ३०१, सुमेर केंद्र, पी. बी. मार्ग, वरळी, मुंबई-४०० ०१८
फोन नं. : +९१ २२ ४९३८ ४२००/४३०० • फॅक्स नं. : +९१ २२ ३०४२ ३४३४ • वेबसाइट : www.jaysynth.com • ई-मेल आयडी : jsec@jaysynth.com

**३१ डिसेंबर २०२१ रोजी संपलेल्या त्रैमासिक आणि नऊ महिन्यांसाठी अलेखापरीक्षित वित्तीय निष्कर्षांचा आराखडा**

(रु. लाखामध्ये, ईपीएस वगळता)

| अ. क्र. | तपशील | एकमेव | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | संपलेले त्रैमासिक | | | संपलेले नऊ महिने | | संपलेले वर्ष |
| | | ३१ डिसेंबर २०२१ | ३० सप्टेंबर २०२१ | ३१ डिसेंबर २०२० | ३१ डिसेंबर २०२१ | ३१ डिसेंबर २०२० | ३१ मार्च २०२१ |
| | | अलेखापरीक्षित | | | अलेखापरीक्षित | | लेखापरीक्षित |
| १ | कार्यामधून एकूण उत्पन्न | ४,५०९ | ३,८६३ | ३,६९५ | १२,३०१ | ८,८३० | १२,४३७ |
| २ | कालावधीसाठी निव्वळ नफा (कर, अपवादात्मक आणि अतिविशिष्ट बाबी पूर्व) | ४१६ | १९५ | २१२ | ८५० | ४९३ | ५३३ |
| ३ | करपूर्व कालावधीसाठी निव्वळ नफा (अपवादात्मक आणि अतिविशिष्ट बाबीपश्चात) | ४१६ | १९५ | २१२ | ८५० | ४९३ | ५३३ |
| ४ | कर पश्चात कालावधीसाठी निव्वळ नफा (अपवादात्मक आणि अतिविशिष्ट बाबीपश्चात) | ४१६ | १९५ | २१२ | ८५० | ४९३ | ५३३ |
| ५ | कालावधीसाठी एकूण व्यापक उत्पन्न [कालावधीसाठी एकत्रित नफा (करपश्चात) एकूण व्यापक उत्पन्न कर पश्चात] | ३३८ | १३२ | १४७ | ६५९ | ३५२ | ४१९ |
| ६ | समभाग भांडवल (दर्शनी मूल्य ₹ १/-) | ८७ | ८७ | ८७ | ८७ | ८७ | ८७ |
| ७ | **प्रति समभाग उत्पन्न (दर्शनी मूल्य ₹ १/-) (सौम्यीकृत आणि खंडित कार्यासाठी)** | | | | | | |
| | ए) मूळ | ३.८९ | १.५२ | १.६९ | ७.५७ | ४.०५ | ४.८२ |
| | बी) सौम्यीकृत | ३.८९ | १.५२ | १.६९ | ७.५७ | ४.०५ | ४.८२ |

(रु. लाखामध्ये, ईपीएस वगळता)

| अ. क्र. | तपशील | एकत्रीकृत | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | संपलेले त्रैमासिक | | | संपलेले नऊ महिने | | संपलेले वर्ष |
| | | ३१ डिसेंबर २०२१ | ३० सप्टेंबर २०२१ | ३१ डिसेंबर २०२० | ३१ डिसेंबर २०२१ | ३१ डिसेंबर २०२० | ३१ मार्च २०२१ |
| | | अलेखापरीक्षित | | | अलेखापरीक्षित | | लेखापरीक्षित |
| १ | कार्यामधून एकूण उत्पन्न | ४,२७८ | ३,७१६ | ३,६३८ | १२,०८९ | ८,९२० | १२,७०२ |
| २ | कालावधीसाठी निव्वळ नफा (कर, अपवादात्मक आणि अतिविशिष्ट बाबी पूर्व) | ३९४ | १८५ | २२९ | ८४० | ५८७ | ६२७ |
| ३ | करपूर्व कालावधीसाठी निव्वळ नफा (अपवादात्मक आणि अतिविशिष्ट बाबीपश्चात) | ३९४ | १८५ | २२९ | ८४० | ५८७ | ६२७ |
| ४ | कर पश्चात कालावधीसाठी निव्वळ नफा (अपवादात्मक आणि अतिविशिष्ट बाबीपश्चात) | २८० | १२८ | १६४ | ६०१ | ४२१ | ४५१ |
| ५ | कालावधीसाठी एकूण व्यापक उत्पन्न [कालावधीसाठी एकत्रित नफा (कर पश्चात) आणि एकूण व्यापक उत्पन्न (कर पश्चात] | ३२४ | १२९ | १६३ | ६५७ | ४२५ | ४९१ |
| ६ | समभाग भांडवल (दर्शनी मूल्य ₹ १/-) | ८७ | ८७ | ८७ | ८७ | ८७ | ८७ |
| ७ | **प्रति समभाग उत्पन्न (दर्शनी मूल्य रु १/-) (सौम्यीकृत आणि खंडित कार्यासाठी)** | | | | | | |
| | ए) मूळ | ३.७२ | १.४८ | १.८७ | ७.५५ | ४.८९ | ५.६४ |
| | बी) सौम्यीकृत | ३.७२ | १.४८ | १.८७ | ७.५५ | ४.८९ | ५.६४ |

**टिपा :**

१. ३१ डिसेंबर २०२२ रोजी संपलेल्या त्रैमासिक आणि नऊ महिन्यांसाठी अलेखापरीक्षित स्वतंत्र व एकत्रीकृत वित्तीय निष्कर्ष उपरोक्त नमूद करण्यात आले आहेत. त्याचे लेखासमितीद्वारे निरीक्षण करण्यात आले आहे आणि संचालक मंडळाद्वारे १४ फेब्रुवारी २०२२ रोजी झालेल्या त्यांच्या सभेमध्ये ते नोंद पटावर घेण्यात आले आहे.
२. सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अॅण्ड डिस्क्लोजर रिक्वायरमेन्ट्स) नियमावली, २०१५ च्या ३३ च्या अनुषंगाने बीएसई लि. मध्ये सादर करावयाच्या ३१ डिसेंबर २०२२ रोजी संपलेल्या त्रैमासिक आणि नऊ महिन्यांसाठी अलेखापरीक्षित स्वतंत्र व एकत्रीकृत वित्तीय निष्कर्षांचा तपशीलवार आराखडा आहे. ३१ डिसेंबर २०२२ रोजी संपलेल्या त्रैमासिक आणि नऊ महिन्यांसाठीच्या वित्तीय निष्कर्षांचा पूर्ण आराखडा स्टॉक एक्सचेंजच्या म्हणजेच **www.bseindia.com** ह्या संकेतस्थळावर आणि कंपनीच्या संकेतस्थळावर म्हणजेच **www.jaysynth.com** वर उपलब्ध आहे.
३. सदर निवेदन कंपनी कायदा २०१३ च्या कलम १३३ अंतर्गत कंपनीज (इंडियन अकाऊंटिंग स्टँडर्ड्स) नियम, २०१५ (इंड एएस)च्या मान्यतेनुसार मान्य करण्यात आले आहे.
४. गत वर्षाचे आकडे गरजेनुसार पुनर्गठित/ पुनःरचित करण्यात आले आहेत.
५. कंपनीचा केवळ एकच विभाग आहे.

जयसिंथ डायस्टफ (इंडिया) लिमिटेडकरिता
संचालक मंडळाच्या वतीने आणि करिता
स्वाक्षरी/-
(पराग शरदचंद्र कोठारी)
अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक
डीआयएन : ००१८४८५२

स्थळ : मुंबई
दिनांक : १४ फेब्रुवारी २०२२